## (अनुभव कथन)
## बापू तूच तारणहार
*– रंजना नायक, मेलबोर्न, ऑस्ट्रेलिया*

------------------------------
---

बापूंविषयी बोलायचं तर कुठून सुरुवात करू, अशीच अवस्था प्रत्येक बापूभक्ताची होऊन जाते, इतका आपल्या जीवनात अगदी मिनिटामिनिटाला ह्या आपल्या बापुरायाचं अस्तित्व आपल्याला जाणवत असतं. केवळ प्रेमाने एक हाक मारायचा अवकाश, बापुराया आपल्यासाठी धावून आलाच म्हणून समजा! आपण हाक मारली आणि बापू धावून आला नाही, असं होऊच शकत नाही.

------------------------------
---

बापूंच्या कृपाछत्राखाली आल्यानंतर बापूंचे जे असंख्य अनुभव मला आले, त्यांतीलच एक मी तुमच्याबरोबर 'शेअर' करणार आहे.

मी ऑस्ट्रेलियात मेलबर्न येथे राहते. माझ्या आईच्या प्रथम वर्षश्राद्धाकरिता मी माझे वडील श्री. गजानन प्रभू, माझी ७ वर्षांची मुलगी रिया आणि माझा २० महिन्यांचा मुलगा नीव ह्यांच्याबरोबर भारतात आले. १४ जानेवारी २०१२ला हे वर्षश्राद्ध होतं. माझे पती श्री. नवीन नायक हे त्यांच्या ऑफिसच्या कामामुळे रजा न मिळाल्याकारणाने आमच्याबरोबर येऊ शकले नव्हते.

भारतात पोहोचल्यावर सर्व यथासांग पार पडलं. परमपूज्य बापूंच्या कृपेने मला 'श्रीअनिरुद्ध गुरुक्षेत्रम्'चंही दर्शन घडलं. त्यानंतर पूज्य समीरदादांना भेटायला आम्ही गेलो असता अचानक काही कामानिमित्त तिथे सद्‌गुरु बापू आले आणि मला अनायासे त्यांच्या दर्शनाची सुवर्णसंधीच प्राप्त झाली.

हळूहळू ऑस्ट्रेलियात परतण्याचा दिवस जवळ आला. इतका लांबचा प्रवास दोन बाळांना घेऊन मी कसा करणार, ह्याचं माझ्यासकट घरच्यांनाही टेन्शन आलं होतं. १८ जानेवारीला सिंगापूरमार्गे मेलबोर्नचा प्रवास ठरला होता. परंतु आदल्याच रात्री (१७ तारखेला) माझ्या पतीचा – नवीनचा फोन आला की आमच्या ट्रॅव्हल एजन्सीने त्यांना फोन करून कळविलं की प्रवासात थोडासा बदल झाला आहे आणि विमान सिंगापूरवरून ब्रिस्बेनला जाऊन मग मेलबोर्नला परतणार आहे. म्हणजे मूळचा १४ तासांचा प्रवास आता २२ तासांचा झाला होता. माझं टेन्शन अजूनच वाढलं. आता तर बापूंशिवाय कोणीच त्राता नव्हता.

ती रात्र काळजीतच गेली.

सकाळी आम्ही आपल्या संस्थेची उदी लावून बापूंचं नाव घेऊन मुंबई विमानतळ गाठला. इमिग्रेशनचे सोपस्कार पार पाडून मुलांबरोबर विमानात पाऊल ठेवलं. एअरहॉस्टेसला माझा बोर्डिंग पास दाखवला.

माझं तिकीट बघून तिने मला नम्र आवाजात माहिती दिली की ''मॅडम, तुमच्यासाठी कोणीतरी अजून दोन तिकिटं बुक केली आहेत. त्यामुळे आता तुम्हाला मधली ४ सीट्सची संपूर्ण रांग वापरता येईल.''

मी बुचकळ्यातच पडले. मी तर दोनच सीट बुक केल्या होत्या. कारण माझ्या मुलाचं वय लहान असल्याने त्याला नियमानुसार स्वतंत्र सीट मिळणार नव्हती परंतु लहान बाळांकरिता जी स्पेशल सीट विमानकंपनी पुरवते, त्यात तो मावत नव्हता. त्यामुळे त्याला माझ्या मांडीवर बसवूनच हा २२ तासांचा प्रवास करणं भाग होतं.

परंतु ह्या अचानक मिळालेल्या कलाटणीमुळे माझा प्रवास चांगलाच सुसह्य होणार होता. मात्र माझा प्रवास सुसह्य होण्याकरिता इतके कष्ट कोणी घेतले असतील, असा विचार मी करत होते.

तेवढ्यात माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला – बापूच! यसऽ, बापूंखेरीज हे कोण करणार? शेवटी त्यांनीच वचन दिलेलं आहे की तुम्ही सातासमुद्रांपलीकडे असा की वाळवंटात की आकाशात, मला अंत:करणपूर्वक हाक मारलीत, तर मी त्याच क्षणाला तुमच्याकरिता धावून येईनच'....आणि ते आपलं वचन नेहमीच पाळतात!

ही बापूंची लीला सांगण्याकरिता मी विमान सुटायच्या आधी माझ्या वडिलांना व पतींना त्वरित फोन केला कारण तेदेखील माझ्याएवढेच टेन्शनमध्ये होते.

माझा प्रवास आरामदायी व निर्धास्त करण्याचा 'प्रोजेक्ट' बापूंनी पुढेही तडीस नेलाच! त्या ज्या अतिरिक्त सीट मिळाल्या होत्या, त्यांवर पाय टाकून माझी दोन्ही बाळं अगदी आरामात झोपली होती.

खरं तर विमानातील बाकीच्या सीट्स संपूर्ण भरलेल्या होत्या व माझी बाळं अशी आरामात सीट्सवर पाय टाकून झोपलेली पाहून आजूबाजूचे लोक माझ्याकडे चमत्कारिक नजरेने पाहत होते की ह्या बाईने केवळ मुलांना झोपण्यासाठी दोन जास्तीच्या सीट्स बुक केल्या की काय!

पण मला मात्र ठायी ठायी ह्या सर्व प्रकारात त्या अनिरुद्धरामाचीच कृपा जाणवत होती. ज्या प्रवासाची मी प्रचंड धास्ती घेतली होती, तो प्रवास इतका आरामदायी केवळ आणि केवळ बापूंमुळेच झाला होता.

मेलबर्नला पोहोचल्यावर सामान घेऊन आम्ही घरी पोहोचलो. घरी पोहोचल्यापोहोचल्या मी सरळ बॅगा टाकल्या आणि थेट देवघराकडे धाव ठोकली. बापूंच्या तसबिरीसमोर उभं राहून हात जोडले आणि कृतज्ञतापूर्वक त्यांना पुन्हा पुन्हा नमस्कार केला – 'बापू, केवळ आणि केवळ तुमच्यामुळेच, हा क्लेशदायक ठरू शकणारा प्रवास आरामदायी प्रवासात बदलला....तुमच्यामुळेच!'

खरंच, बापू त्याच्या लेकरांना 'बेस्ट' द्यायलाच बसला आहे आणि 'तो' त्याचं काम अचूकपणे करतोच.

मात्र आपण त्याच्या चरणांशी दृढ राहिलं पाहिजे, त्याचं बोट घट्ट धरून ठेवलं पाहिजे. त्याने सांगितलेलं आह्निक, अन्य उपासना, स्तोत्रपठण, नामस्मरण नियमितपणे सुरू ठेवलं पाहिजे.

बापूराया, ह्या व पुढील प्रत्येक जन्मात तुझ्या चरणांवरील प्रेम व विश्वास तुझ्याच कृपेने कायम राहूदे, हीच तुझ्या चरणी प्रार्थना!